ePaper

## राज्यात थंडीची लाट, पुणे 9.9°C; नाशिकमध्ये पारा 10.5 अंशावर

वर्ष - 8 । अंक -141 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**

- श्रीनिवासन यांच्यावर फिक्सिंगचे आरोप
- पिंक बॉलपूर्वी ऑस्ट्रेलियाने संघात बदल
- शिवमंदिर असल्याच्या याचिकेवर नाराजी!
- जल्द ही शेर वापस आयेगा


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 29 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## झुकलेला खांदा, उदास चेहरा!

# काळजीवाहू मुख्यमंत्री काळजीत!

### महायुतीच्या बैठकीआधी 20 मिनिटं 'शिंदे-शाही' चर्चा; काळजीवाहूंनी धडाधड प्रस्ताव मांडले

। नवी दिल्ली । महाईन्यूज

**महाराष्ट्राचं लक्ष लागून राहिलेली हायव्होल्टेज बैठक काल रात्री राजधानी दिल्लीमध्ये उशिरा पार पडली. भाजप श्रेष्ठी अमित शाह यांनी महाराष्ट्रातील महायुतीचे तीन शिलेदार देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक घेतली. यावेळी मुख्यमंत्रिपदाबाबत अंतिम फैसला झाल्याची माहिती आहे, परंतु त्याबाबतची घोषणा मुंबईतून होणार आहे. अडीच तास चाललेल्या कालच्या बैठकीत मंत्रिमंडळ खातेवाटपावरही चर्चा झाली. बैठकीनंतर समोर आलेल्या फोटोंमध्ये काळजीवाहू मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी 'काळजी' बैठकीचं सार सांगून जाते.**



भाजपचा मुख्यमंत्री होणार, हे जवळपास निश्चित झाले असून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाच्या घोषणेची केवळ औपचारिकता बाकी आहे. परंतु मुख्यमंत्रिपदाचं नाव भाजपचे निरीक्षक मुंबईत येऊन जाहीर करणार आहेत.

विशेष म्हणजे, दिल्लीमध्ये अमित शाहांची तिघा नेत्यांसोबत बैठक होण्यापूर्वी एकनाथ शिंदेंसह स्वतंत्र चर्चा झाली. यावेळी एकनाथ शिंदेंनी काही प्रस्ताव शाहांसमोर ठेवल्याचे बोलले जाते. अमित शाहांच्या निवासस्थानी झालेल्या २० मिनिटांच्या बैठकीत शिंदेंनी मुख्य विषयालाच थेट हात घातला. खरं तर भाजपश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य असेल, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्रिपदावरचा दावा सैल केला होता.

### शिंदेंचे शाहांना कोणते प्रस्ताव?

एकनाथ शिंदे यांनी शाहांसमोर ठेवलेल्या प्रस्तावात म्हटलं की, शिवसेनेला मुख्यमंत्रिपद मिळणार नसेल, तर सध्या असलेल्या खात्यांपेक्षा पाच अधिक वजनदार खाती मिळावीत. उपमुख्यमंत्रिपद दिलं जाणार असल्यास अर्थ किंवा गृह यापैकी एक पद मिळावं, अशी अपेक्षा एकनाथ शिंदेंनी व्यक्त केली.

### बैठकीनंतरची पहिली प्रतिक्रिया

एकनाथ शिंदे बैठकीतून बाहेर आल्यानंतर माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना घेराव घातला. फोटोत दिसणाऱ्या नाराजीवरुनही त्यांना छेडण्यात आलं. परंतु मी कधी गंभीर असतो कधी हसरा असतो, असं मोघम उत्तर देत शिंदेंनी प्रश्न उडवून लावला. बैठक सकारात्मक झाली, सत्तास्थापनेवर चर्चा झाली, आमच्यात समन्वय आहे, अशी उत्तरं शिंदेंनी दिली. मी काळजीवाहू मुख्यमंत्री या नात्याने सर्वांची काळजी घेतोय, असा विनोदही त्यांनी केला. पुढे, महाराष्ट्रात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याचं सांगत त्यांनी मुख्य प्रश्नाला बगल दिली. परंतु फोटोतील शिंदेंची देहबोली, चेहऱ्यावरील हावभाव हे बैठकीत काय घडलं, याचं सूतोवाच करतात.

### बैठकीचा फोटो चर्चेत

दिल्लीत एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह यांची भेट घेतली. अजित पवारांसह प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरेही आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डाही आहेत. दरम्यान हा फोटो चर्चेत आला आहे कारण या फोटोंमध्ये अमित शाह यांच्यासह सगळे दिग्गज नेते हसताना आणि आनंदी दिसत आहेत. अपवाद आहे तो एकनाथ शिंदेंच्या चेहऱ्याचा. एकनाथ शिंदे या फोटोंध्ये उभे आहेत मात्र त्यांच्या चेहऱ्यावर असलेल्या गांभीर्याने लक्ष वेधलं आहे.

### फडणवीस यांच्या चेहऱ्यावर आनंद

गुरुवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या आसपास सुरु झालेली बैठक रात्री १२ वाजता संपली. या बैठकीतील फोटो बाहेर आल्यानंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या चेहऱ्यावरील भाव सगळं सांगत होते. एकनाथ शिंदे यांचा खांदा पडलेला दिसला. त्यांच्या डोळ्यातील भाव सगळं काही सांगत होताच. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात काम करतील, असे दिसतेय. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांना वाटाघाटी करण्यात म्हणावे तसं यश मिळाले, नसल्याचे बोलले जातेय. उदय सामंत यांचं मुख्यमंत्रिपदावरील वक्तव्य आणि मराठा चेहरा म्हणून एकनाथ शिंदे यांच्यावर भाजप पुन्हा विश्वास दाखवणार का? अशी चर्चा सुरु झाली होती. पण गुरुवारी दिल्लीतील फोटो समोर आले अन् एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत, यावर जवळपास शिक्कामोर्तब झाले. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. अमित शाह यांनी पुष्पगुच्छ देत देवेंद्र फडणवीस यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या.

# हेल्मेट सक्तीच्या कारवाईचा बडगा नाही

## जानेवारीत अंमलबजावणी करण्याचे पोलीस आयुक्तांचे संकेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विना हेल्मेट दुचाकीस्वार आणि पाठीमागे बसलेला प्रवासी अशा दोघांवर कारवाई करण्याच्या राज्य सरकारने काढलेल्या आदेशापासून पुणेकरांना तुर्तास दिलासा मिळाला आहे. वाहतुकीबाबत शहरात कार्यरत असलेले विविध विभाग, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी अशा सर्वांची चर्चा करून, हेल्मेटच्या वापराबाबत जनजागृती केल्यानंतर एक जानेवारीपासून कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी स्पष्ट केले.**



विना हेल्मेट दुचाकीस्वार आणि पाठीमागे बसलेल्या अशा दोघांवर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना दिले होते. आत्तापर्यंत केवळ विना हेल्मेट असलेल्या दुचाकीचालकांवर कारवाई करण्यात येत होती. मात्र, सहप्रवाशावर देखील कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांच्या ई-चलन मशिनमध्ये बदल करण्यात आला आहे. केवळ सहप्रवाशावर कारवाई करण्याची तरतूद त्यात करण्यात आल्याचे महासंचालकांनी काढलेल्या पत्रात नमूद आहे. त्यानुसार काही ठिकाणी कारवाई देखील सुरू करण्यात आली होती. त्याला विविध स्तरांतून विरोध झाल्यामुळे याबाबत समाजातील विविध घटकांशी आणि प्रशासकीय यंत्रणांशी चर्चाकरून जानेवारी महिन्यात कारवाईचा निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी गुरुवारी दिली.पुण्यात हेल्मेटसक्ती लागू करण्यात येवू नये, या मागणीसाठी आमदार हेमंत रासने यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन चर्चा केली. दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढत असल्याने महामार्गावरील दुचाकीस्वार आणि सहप्रवाशांसाठी हे आदेश काढण्यात आल्याचे यावेळी आयुक्तांनी रासने यांना सांगितले. विना हेल्मेट दुचाकीस्वार व सहप्रवासी यांचे अपघात व त्यात मृत्युमुखी तसेच जखमी होणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे राज्यात हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. मात्र, त्यानंतरही काही दुचाकीचालक हेल्मेटचा वापर करत नसल्याचे दिसून आले आहे. स्वतःच्या सुरक्षेसाठी वाहनचालकांनी नियमित हेल्मेटचा वापर करावा, यासाठी आम्ही जनजागृती करण्यावर भर देणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. विना हेल्मेट दुचाकीस्वार आणि पाठीमागे बसलेल्या अशा दोघांवर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना दिले होते. आत्तापर्यंत केवळ विना हेल्मेट असलेल्या दुचाकीचालकांवर कारवाई करण्यात येत होती. मात्र, सहप्रवाशावर देखील कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांच्या ई-चलन मशिनमध्ये बदल करण्यात आला आहे. केवळ सहप्रवाशावर कारवाई करण्याची तरतूद त्यात करण्यात आल्याचे महासंचालकांनी काढलेल्या पत्रात नमूद आहे. त्यानुसार काही ठिकाणी कारवाई देखील सुरू करण्यात आली होती. त्याला विविध स्तरांतून विरोध झाल्यामुळे याबाबत समाजातील विविध घटकांशी आणि प्रशासकीय यंत्रणांशी चर्चाकरून जानेवारी महिन्यात कारवाईचा निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी गुरुवारी दिली.पुण्यात हेल्मेटसक्ती लागू करण्यात येवू नये, या मागणीसाठी आमदार हेमंत वाढत असल्याने महामार्गांवरील दुचाकीस्वार आणि सहप्रवाशांसाठी हे आदेश काढण्यात आल्याचे यावेळी आयुक्तांनी रासने यांना सांगितले.

> “ सुरक्षेच्या दृष्टीने दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. शहरात वाहनचालकांनी हेल्मेटचा वापर करावा याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. याबाबात शहरातील विविध घटकांशी चर्चा करून आम्ही कारवाईसंदर्भात जानेवारीमध्ये निर्णय घेणार आहोत.
>
> **-अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त

# शहरातील टेकड्यांवरील सुरक्षेच्या उपाययोजना

## पुणे पोलिसांकडून राज्य शासनाकडे सोमवारी अहवाल पाठविणार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**टेकड्यांवर फिरायला जाणाऱ्या नागरिकांची होणारी लूट आणि बोपदेव घाटातील सामूहिक बलात्काराच्या घटनेंतर शहरातील टेकड्यांचा विषय ऐरणीवर आला होता.**



तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील सात नव्या पोलिस ठाण्यांच्या उद्घाटन कार्यक्रमात ‘शहरातील टेकड्या आणि अन्य ब्लॉक स्पॉट सुरक्षित करण्यासाठी आवश्यक स्वतंत्र निधी देण्यात येईल,’ असे जाहीर केले होते. त्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील तेराहून अधिक टेकड्या आणि सातहून अधिक ब्लॉक स्पॉट निश्चित करण्यात आले असून, संबंधित ठिकाणे सीसीटीव्ही आणि प्रकाशझोताच्या माध्यमातून सुरक्षित केली जाणार आहेत. यासंदर्भातील अहवाल सोमवारी (२ डिसेंबर) राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. शहरातील टेकड्या आणि ब्लॉक स्पॉटवर ६०० अत्याधुनिक कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. यामध्ये पीटीझेड कॅमेरे, फिक्स कॅमेरे आणि एएनपीआर कॅमेरे यांचा समावेश असून सराईत गुन्हेगारांचे चेहरे बंदिस्त करण्यासाठी (फेस रिडींग) कॅमेरे देखील बसवण्यात येणार आहेत. टेकड्यांसह ब्लॉक स्पॉटवर कॅमेऱ्यांसह पॅनिक बटण असणार आहे. पॅनिक बटण दाबताच थेट पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला (कंट्रोल रूम) अलर्ट मिळणार आहे. त्यासोबतच पॅनिक बटणवर असलेल्या कॅमेऱ्यामुळे थेट तेथील व्हिडिओ चित्रीकरण देखील दिसण्यास सुरूवात होणार आहे. पॅनिक बटण दाबण्याच्या एक मिनीट आधीचा आणि नंतरचा व्हिडिओ त्या विशेष कॅमेऱ्याद्वारे चित्रीत केला जाईल अशी सुविधा यामध्ये असणार आहे. याशिवाय पॅनिक बटण दाबताच त्या परिसरातील अन्य कॅमेरे देखील अलर्ट मोडवर जातील असे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे.मोठा गजर (अलार्म) वाजणार आहे, जेणेकरून गस्तीवरील पोलिसांना लगेचच संबंधित ठिकाणी पोहोचण्यास मदत होणार आहे.

### टु वे पीए सिस्टिम

टेकडीच्या भागांमध्ये ‘टु वे पीए सिस्टिम’ (माईक आणि स्पिकर) देखील लावले जाणार आहेत. याशिवाय रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसावे म्हणून १७७ पेक्षा अधिक प्रखर प्रकाशझोत (फ्लड लाइट्स) लावले जाणार आहेत. एकंदरीतच सिटी सर्वेलन्सचे बेस्ट फिचर्स यामध्ये समाविष्ट करण्यात आले असून, यामुळे अनधिकृत आणि अवैध घटनांना प्रतिबंध घालण्यास मदत होणार आहे. त्यासोबतच या ठिकाणी कमीत कमी वेळेत पोलीस पोहोचावेत यासाठी सात विशेष मोबाईल सर्विलन्स व्हेईकल देखील तैनात करण्यात येणार.

### संत ज्ञानेश्वर महाराजांचा 728 वा संजीवन समाधी सोहळा

# इंद्रायणी तिरी वारकऱ्यांचा मेळा!

## एकादशीनिमित्त हजारो भाविक आळंदीत दाखल

। आळंदी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**टाळ-मृदंगाचा टिपेला पोहोचलेला भक्तिकल्लोळ.., माउली- माउली असा अखंड जयघोष.. वैष्णवांच्या मेळ्याने बहरून आलेला इंद्रायणीचा काठ..माउलींच्या दर्शनासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा.. अशा वातावरणाने सोमवारी (दि.२५) अलंकापुरी दुमदुमून गेली होती. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यात मंगळवारी एकादशी असल्याने त्याच्या पूर्वसंध्येला मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातून आळंदीमध्ये दिंड्या दाखल झाल्या आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज यांचा 728 वा संजीवन समाधी सोहळा आज पार पडतो आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रभरातून वारकरी इंद्रायणी नदीच्या काठी जमले आहेत. इंद्रायणी नदीत स्नान करण्यासाठी वारकऱ्यांनी गर्दी केलीय.**





आळंदीमध्ये वारकऱ्यांचा मेळा जमला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा 728 वा संजीवन समाधी सोहळा पार पडत आहेत. त्यासाठी आळंदी मध्ये राज्यभरातून लाखो भावी आळंदी मध्ये दाखल झाले आहेत. आज पुण्यातील आळंदीमध्ये वारकऱ्यांचा मेळा जमला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा 728 वा संजीवन समाधी सोहळा पार पडत आहेत. त्यासाठी आळंदी मध्ये राज्यभरातून लाखो भावी आळंदी मध्ये दाखल झाले आहेत.

पवित्र इंद्रायणीत स्नान करून वारकरी माऊलींच्या दर्शनासाठी जात आहे. इंद्रायणी घाट वारकऱ्यांनी गजबजून गेलाय. सगळीकडे माऊलींच्या नावाचा गजर पाहायला मिळतो आहे. पवित्र इंद्रायणीत स्नान करून वारकरी माऊलींच्या दर्शनासाठी जात आहे. इंद्रायणी घाट वारकऱ्यांनी गजबजून गेलाय. सगळीकडे माऊलींच्या नावाचा गजर पाहायला मिळतो आहे.

दुपारी 12 च्या सुमारास घंटानाद करत समाधीवर फुलांची पुष्पवृष्टी करून हा सोहळा पार पडणार आहे. यावेळी महाराष्ट्रभरातून आलेले भाविक उपस्थित असतील. संजीवन सोहळ्यानिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या असंख्य भाविकांनी हा सोहळा प्रत्यक्ष नयनांनी अनुभवत ‘श्री’चे दर्शन घेतले आहे. सगळेच वारकरी भक्तीरंगात न्हाऊन निघालेत.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या संजीवन समाधी सोहळा कार्तिकीवारीतवारीत मंगळवारी (दि.२६) आलेल्या कार्तिकी एकादशीच्या भक्ती पर्वणीचा योग साधण्यासाठी सोमवारी मोठ्या संख्येने भाविक आळंदीत दाखल झाले. इंद्रायणी घाटावर त्यांनी फुगडीचा फेर धरला तर काहींनी टाळ मृदूंगाच्या गजरात देहभान विसरून नाचण्याचा आनंद लुटला.

पहाटेपासूनच वारकऱ्यांच्या राहुट्या व धर्मशाळांमधून अभंगाच्या सुरावटी निघू लागल्या आहेत. टाळ- मृदंगाचा गजराने आसमंत भरून गेला असून स्नानासाठी इंद्रायणीच्या तीरावर वारकऱ्यांची गर्दी होऊ लागली आहे. कार्तिकीसाठी इंद्रायणीला पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे पाण्याप्रमाणे भाविकांची भक्तीही जणू दुथडी भरून वाहत होती.

### कार्तिकी एकादशीनिमित्त होणारे कार्यक्रम...

पहाटे १.०० वाजता : ११ ब्रम्हवृंदांच्या वेदघोषात पवमान अभिषेक व दुधारती

दुपारी १२ ते १२.३० वाजता : महानैवद्य

दुपारी १.०० वाजता : श्रींची नगरप्रदक्षिणा

रात्री ८.३० : धुपारती

रात्री १२ ते २ : श्री. मोझे यांच्यातर्फे जागर.

### प्रशासनाकडून विविध सोई-सुविधा उपलब्ध

दुसरीकडे माउलींच्या मंदिरामध्ये पहाटेपासून विविध धार्मिक विधीला सुरुवात झाली होती. स्नानानंतर माउलींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दर्शनबारी पूर्णपणे भरून गेली होती. यंदाच्या सोहळ्यासाठी हजारो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. त्यांच्यासाठी आळंदी पालिका व जिल्हा प्रशासनाकडून विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### महात्मा फुले यांच्या प्रगत विचारांचा वारसा जोपासावा

## महापालिकेच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्त्री शिक्षण, समानता आणि सत्यासाठी आपले आयुष्य व्यतीत करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले हे भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीचे प्रणेते मानले जातात, त्यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करून अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रगत विचारांचा वारसा सर्वांनी जोपासावा असे मत व्यक्त केले.**



क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकामधील त्यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. मुख्य प्रशासकीय इमारतीमधील कार्यक्रमास विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उद्यान अधिक्षक योगेश वाळूंज, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे तर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक आणि विचार प्रबोधन पर्व येथील कार्यक्रमास माजी स्थायी समिती सभापती संतोष लोंढे, हिरामण भुजबळ, रामभाऊ दरवडे, तुकाराम गायकवाड, विलास लोंढे, किरण लोंढे, शेखर वाघ, प्रदीप पवार, संतोष सोनवणे चंद्रवदन बगाडे, कविता खराडे, रचना गायकवाड, जनसंपर्क विभागाचे देवेंद्र मोरे ,किसन केंगळे, अभिजीत डोळस, विकास गायकांबळे, आणि सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



## भूमिका

# अनावश्यक आणि अप्रस्तुत

**बांगलादेशमधील कुणा चिन्मय कृष्ण दास या हिंदू महंताच्या अटकेवरून भारत-बांगलादेश संबंधांमध्ये तणाव येणे हे अनपेक्षित आणि अप्रस्तुत आहे. बांगलादेशच्या शेख हसीना यांना त्या देशातील संतप्त विद्यार्थी निदर्शकांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देणे भाग पाडल्यानंतर त्यांनी देशत्याग केला आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या.**

५ ऑगस्टपासून भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांदरम्यान व्यक्त किंवा अव्यक्त तणाव कायम आहे. शेख हसीना यांच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे खटले चालवायचे असल्यामुळे त्यांची बांगलादेशात पाठवणी करावी, अशी विनंती त्या देशाच्या काळजीवाहू सरकारने केली आहे. या मागणीस भारताने प्रतिसाद दिलेला नाही हा बांगलादेशचा आक्षेप आहे. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस हे तेथीस काळजीवाहू सरकारचे प्रमुख सल्लागार आहेत. त्यांनी बांगलादेशातील जनमताचा मान राखतानाच, भारताशी तूर्त जुळवून घेण्याचे धोरण अंगीकारले आहे. ही तारेवरची कसरत ठरते. युनूस हे लोकनियुक्त नेते नाहीत. तेथे निवडणुका होऊन लोकनियुक्त सरकार स्थापन झाल्यानंतर अशी परिस्थिती राहणार नाही. बहुधा बांगलादेश नॅशनल पार्टीचे (बीएनपी) पक्षाचे सरकार स्थापन झाल्यानंतर असे सरकार



सुरुवातीस तरी भारतविरोधी राहण्याची शक्यताच अधिक. या सरकारने शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी भारताकडे केल्यास ती आपल्याला फार काळ पुढे ढकलता येणार नाही. हसीना यांच्या अवामी लीगप्रमाणे बीएनपीशी भारताचे सौहार्दाचे संबंध नाहीत. या पार्श्वभूमीवर चिन्मय कृष्ण दास प्रकरणाकडे पाहावे लागेल. याचे कारण ही व्यक्ती म्हणजे भारत सरकारच्या बांगलादेशातील वकिलातीमधील कोणी मुत्सद्दी वा कर्मचारी नाही. ते हिंदू महंत आहेत, तसेच सध्या आंदोलकाच्या भूमिकेत आहेत. इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा कॉन्श्यसनेस अर्थात इस्कॉन या आंतरराष्ट्रीय संघटनेशी संलग्न आहेत. स्वत:ला सनातनी म्हणवतात आणि 'बांगलादेश सम्मीलित सनातन जागरण जोती' या संघटनेचे प्रवक्ते आहेत. चत्तोग्राम किंवा चितगाँग येथे निदर्शनादरम्यान चिन्मय कृष्ण दास यांनी बांगलादेशाच्या राष्ट्रध्वजाचा अवमान केला, असे त्यांच्या विरोधात बीएनपीच्या एका पदाधिकाऱ्याने केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्याची दखल घेत दास यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्यांना अटक करण्यात आली. गेले काही महिने आणि विशेषत: शेख हसीना प्रकरणानंतर बांगलादेशात अल्पसंख्याकांविरुद्ध आणि त्यातही हिंदू नागरिकांच्या मत्ता आणि प्रार्थनास्थळांना लक्ष्य करण्याच्या घटना घडल्या. शेख हसीना यांची भारत सरकारशी जवळीक असल्याचा राग मानून आणि हिंदू म्हणजे भारतप्रेमी आणि बांगलादेशद्वेष्टे असल्याचे गृहीत धरून हे हल्ले झाले. सुरुवातीस त्या वेळी भारत सरकारने चिंता व्यक्त करताना, बांगलादेशातील काळजीवाहू सरकारला सबुरीचा सल्ला दिला होता. त्याची दखल घेऊन मोहम्मद युनूस यांनी एका हिंदू मंदिराला भेट देऊन, धार्मिक सलोखा राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले होते.पण चिन्मय कृष्ण दास यांच्या अटकेवरूनही भारताच्या परराष्ट्र खात्याने चिंता व्यक्त करणे, दास यांना जामीन नाकारल्याबद्दल गर्भित नाराजी व्यक्त करणे पूर्णतया अप्रस्तुत ठरते. याचे कारण दास यांची अटक आणि त्यांच्या विरुद्धची कोणतीही कायदेशीर कारवाई ही बांगलादेशची अंतर्गत बाब ठरते. हिंदू आणि अल्पसंख्याकांच्या जीवित आणि मत्तारक्षणाविषयी तेथील सरकारला सल्ला देणे एक वेळ मान्य होऊ शकते. पण येथेही, असाच सल्ला बांगलादेश किंवा इतर कोणत्याही देशाकडून आल्यास आपला कसा तीळपापड होतो याचीही जाण असलेली बरी. पुन्हा एखाद्या महंताविषयी भारताच्या परराष्ट्र खात्याने इतके संवेदनशील होण्याचे कारणच काय? चिन्मय दास दोषी आहेत, की त्यांना हिंदू धर्मीयांच्या आंदोलनांचे नेतृत्व केल्याबद्दल सरकारकडून शिक्षा मिळाली वगैरे तर्क विश्लेषक किंवा समाजमाध्यमजीवींना लढवू देत. त्यात सरकारने पडण्याचे काहीही प्रयोजन नाही. खुद्द चिन्मय दास यांनीही शांततेच्या मार्गानेच आंदोलन सुरू ठेवावे.

## प्रासंगिक »

### 'गुमराह'महाराष्ट्र!

***सत्तेची कवाडे आता भाजपसाठी सताड उघडली गेली आहेत आणि पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वास या वेळी मुख्यमंत्रीपद देवेंद्र फडणवीस यांना द्यावे लागेल, असे दिसते.***

२०१९ साली महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभेसाठी एकाच वेळी निवडणुका झाल्या. दोन्ही ठिकाणी निकाल साधारण एकसारखाच लागला. हरियाणा आणि महाराष्ट्रात दोन्ही ठिकाणी भाजप सगळ्यात मोठा पक्ष म्हणून समोर आला. पण कोणालाच स्पष्ट बहुमत नाही, अशी स्थिती. त्या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी जातीने हरियाणाची सरकार बनवण्यासाठी केंद्रीय नेतृत्वाने फार काही मदत केल्याचे दिसले नाही. टीचभर हरियाणात स्वपक्षीय सरकार यावे यासाठी सक्रिय असलेले भाजपचे शीर्षस्थ नेते भव्य अशा महाराष्ट्रातही भाजपचे सरकार यावे यासाठी तितके सक्रिय नसणे हे तेव्हाही अतर्क्य होते. यातूनच मग भाजपचे सहकारी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी तसेच काँग्रेस यांची आघाडी जमली आणि भाजपची सरकार स्थापनेची संधी हुकली.

भारतीय राज्यघटनेच्या मंजुरीचा अमृत महोत्सव साजरा करत असताना त्याच्या आदल्या दिवशीच म्हणजे सोमवार २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या उद्देशिकेतील 'समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि एकात्मता' या शब्दांवर आक्षेप घेणारी याचिका फेटाळून लावली याचे महत्त्व मोठे आहे.

# समाजवाद आणि धर्मनिपेक्षतेचा सर्वोच्च निर्णय

१९७६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान कालवश इंदिरा गांधी सरकारने ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार उद्देशिकेत वरील तीन संज्ञा समाविष्ट केल्या होत्या. त्याला आव्हान देणाऱ्या याचिका माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी आणि ॲड.अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केल्या होत्या. तत्पूर्वी अशीच एक याचिका बलरामसिंह यांनी ॲड. विष्णू शंकर जैन यांच्यामार्फतही दाखल केली होती. त्यावर सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या घटनापीठाने निर्णय दिला. त्यात त्यांनी म्हटले आहे 'धर्मनिरपेक्षता हा शब्द सर्व धर्माचा समान आदर करणारे गणराज्य दर्शवतो तर समाजवाद या शब्दातून सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक अशा सर्व प्रकारच्या शोषणाचे उच्चाटन करण्याचा निर्धार दिसतो.' या निकालात सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, 'राज्यघटना आणि उद्देशिका कोणत्याही विशिष्ट, डाव्या किंवा उजव्या विचारधारेचा आणि आर्थिक धोरण व रचनेचा



पुरस्कार करत नाही. कल्याणकारी राज्य आणि संधीची समानता याच्याशी कटिबद्धता समाजवाद दर्शवतो.' तसेच न्यायालयाने असेही म्हटले आहे की, 'या याचिकांवर अधिक विचारविनिमय अथवा निवाड्याची गरज नाही. राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार उद्देशिकेलाही लागू होतो.' या निवाड्यातील हे वाक्य गांभीर्याने लक्षात घेण्याची गरज आहे. कारण संविधानाच्या उद्देशिकेमध्येही बदल करण्याचा संसदेचा अधिकार नाकारता येत नाही. म्हणूनच ज्यांना उद्देशिकेतील सर्व तत्वे मान्य आहेत त्यांनी त्याच्या जोपासनेसाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची व त्याबाबत सतर्क राहण्याची गरज आहे.गेल्या वर्षी संसदेच्या विशेष अधिवेशनामध्ये केंद्र सरकारने खासदारांना दिलेल्या राज्यघटनेच्या प्रतीमधील प्रास्ताविकेत 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे शब्द नसल्याचे उघडकीस आले होते. त्यावर टीका सुरू झाल्यावर केंद्र सरकारच्या वतीने हे शब्द नंतर घालण्यात आले. आम्ही दिलेली घटनेची प्रत मूळ प्रतिवरून तयार केली आहे असा युक्तिवाद केला गेला होता. याचा अर्थ केंद्र सरकारने आजवर झालेल्या सव्वाशेहून अधिक घटनादुरुस्त्या (त्यातील पंचविसावर घटनादुरुस्त्या विद्यमान केंद्र सरकारच्या काळातील आहेत) उल्लेखित नसलेल्या प्रती खासदारांना दिल्या होत्या का हा प्रश्न आहे. तसे असेल तर तो गंभीर मुद्दा आहे. अर्थात असा शब्दगाळी प्रयत्न यापूर्वीही काही वेळा झाला आहे. यापूर्वी या सरकारने २६ जानेवारीला दिलेल्या जाहिरातीतूनही हे दोन शब्द गाळलेले होते. त्यावेळी ही टीका झाल्यावर असेच मूळ प्रतीचे लंगडे समर्थन केले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार?

## दिल्लीत दाखल होताच एकनाथ शिंदेंचं मोठं विधान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर आता महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन करण्याच्या हालचाली सुरु आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठकांवर बैठका सुरु आहेत. खरं तर २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. त्यानंतर आज जवळपास पाच दिवस झाले पण अद्यापही सरकार स्थापन होऊ शकलेलं नाही. त्यामुळे सरकार स्थापन करण्यासाठी नेमकी अडचणी काय आहेत? याबाबत राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.**



दरम्यान, काळजीवाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदावर दावा केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, काल एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत भाजपाचे दिल्लीतील नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल अशी भूमिका घेतली. त्यानंतर आज उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील पत्रकार परिषद घेत आपली भूमिका जाहीर करत वरिष्ठ जो निर्णय घेतील तो मान्य असेल असं जाहीर केलं. त्यामुळे आता भाजपाचा मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाल्याचं मानलं जातं. मात्र, नेमकं मुख्यमंत्री कोण होणार? याची घोषणा अद्याप झालेली नाही. पण मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव चर्चेत आहे.या पार्श्वभूमीवर आज देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार हे दिल्लीत दाखल झाले आहेत. दिल्लीत महाराष्ट्रातील या तीन्ही नेत्यांची गृहमंत्री अमित शाह आणि जे पी नड्डा यांच्याबरोबर महत्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? महायुतीचं सरकार कसं असणार? मंत्रिमंडळ कसं असणार? कोणत्या पक्षाला किती मंत्रिपद मिळणार? अशा विषयावर सविस्तर चर्चा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. या बैठकीनंतर कोण मुख्यमंत्री होणार? याबाबत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.दरम्यान, एकनाथ शिंदे हे थोड्यावेळापूर्वी बैठकीसाठी दिल्लीत दाखल झाले. यावेळी दिल्लीत पोहोचताच त्यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. 'कोणत्याही पदापेक्षा लाडका भाऊ हे पद माझ्यासाठी मोठं आहे', असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. त्यांच्या या सूचक विधानामुळे त्यांनी मुख्यमंत्रिपद सोडल्याचं यावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचं बोललं जात आहे."आता बैठकीसाठी मी जात आहे. बैठकीत जी काही चर्चा होईल ते मी सांगणार आहे. आमची बैठक सकारात्मक होईल. काल देखील मी पत्रकार परिषद घेऊन माझी भूमिका स्पष्ट केली. आता कुठलाही अडथळा महायुतीचा मुख्यमंत्री होण्यामध्ये नाही. लाडक्या बहिणींबाबत देखील मी पत्रकार परिषदेत बोललो. आता लाडक्या बहिणींचा भाऊ दिल्लीत दाखल झालेला आहे. लाडका भाऊ ही ओळख माझ्या सर्व पदापेक्षा मोठी आहे. आजच्या बैठकीत मंत्रिमंडळासह सविस्तर चर्चा होईल आणि बैठकीत काय चर्चा झाली हे देखील सांगेल. अजित पवार हे देखील बैठकीला येणार आहेत. ते आधी आल्यामुळे त्यांची पक्षांची बैठक झाली असेल", असं एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे., काळजीवाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदावर दावा केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, काल एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत भाजपाचे दिल्लीतील नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल अशी भूमिका घेतली. त्यानंतर आज उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील पत्रकार परिषद घेत आपली भूमिका जाहीर करत वरिष्ठ जो निर्णय घेतील तो मान्य असेल असं जाहीर केलं. त्यामुळे आता भाजपाचा मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाल्याचं मानलं जातं. मात्र, नेमकं मुख्यमंत्री कोण होणार? याची घोषणा अद्याप झालेली नाही. पण मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव चर्चेत आहे.या पार्श्वभूमीवर आज देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार हे दिल्लीत दाखल झाले आहेत. दिल्लीत महाराष्ट्रातील या तीन्ही नेत्यांची गृहमंत्री अमित शाह आणि जे पी नड्डा यांच्याबरोबर महत्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? महायुतीचं सरकार कसं असणार? मंत्रिमंडळ कसं असणार? कोणत्या पक्षाला किती मंत्रिपद मिळणार? अशा विषयावर सविस्तर चर्चा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. या बैठकीनंतर कोण मुख्यमंत्री होणार?

### एकनाथ शिंदे काय म्हणाले?

याबाबत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.दरम्यान, एकनाथ शिंदे हे थोड्यावेळापूर्वी बैठकीसाठी दिल्लीत दाखल झाले. यावेळी दिल्लीत पोहोचताच त्यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. 'कोणत्याही पदापेक्षा लाडका भाऊ हे पद माझ्यासाठी मोठं आहे', असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. त्यांच्या या सूचक विधानामुळे त्यांनी मुख्यमंत्रिपद सोडल्याचं यावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचं बोललं जात आहे."आता बैठकीसाठी मी जात आहे. बैठकीत जी काही चर्चा होईल ते मी सांगणार आहे. आमची बैठक सकारात्मक होईल. काल देखील मी पत्रकार परिषद घेऊन माझी भूमिका स्पष्ट केली. आता कुठलाही अडथळा महायुतीचा मुख्यमंत्री होण्यामध्ये नाही. लाडक्या बहिणींबाबत देखील मी पत्रकार परिषदेत बोललो.

# "मुख्यमंत्रिपद नशिबात असावं लागतं"

## विजय शिवतारे यांनी मुख्यमंत्रिपदावरून अजित पवारांना डिवचलं

। सांगली । प्रतिनिधी
। महाईन्यूज ।

**विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. तसेच महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर आता महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन होणार आहे. सरकार स्थापन करण्यासाठी सध्या महायुतीच्या नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. मात्र, २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला.**

जवळपास पाच दिवस झाले आहेत. मात्र, अद्यापही राज्यात सरकार स्थापन झालेलं नाही. सरकार स्थापनेसाठी हालचाली सुरु आहेत. पण अद्याप ठोस कोणताही निर्णय झालेला नाही. काळजीवाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा मुख्यमंत्री पदावर दावा केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, त्यानंतर पत्रकार परिषद घेत एकनाथ शिंदे यांनी भाजपाचे दिल्लीतील नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल अशी भूमिका जाहीर केली. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील आपलीही अशाच प्रकारची भूमिका असल्याचं जाहीर केलं. त्यामुळे भाजपाचा मुख्यमंत्री होणार हे जवळपास निश्चित झालं. मात्र, भाजपामध्ये नेमकी मुख्यमंत्री कोण होणार? याबाबत अद्याप नाव जाहीर करण्यात आलेलं नाही.तसेच मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव चर्चेत आहे. पण यावर अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री नेमकं कोण होणार? याची अनेकांना उत्सुकता लागलेली आहे. शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी भाष्य करत अजित पवारांना मुख्यमंत्रिपदावरून डीवचलं आहे. 'मुख्यमंत्री पद नशिबात असावं लागतं.



### विजय शिवतारे काय म्हणाले?

"एकनाथ शिंदे हे आजही काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत. जे निर्णय वरिष्ठ घेतील त्या निर्णयानुसार वागणे अशा प्रकारचा निर्णय एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. राहिली गोष्ट अजित पवारांची, तर प्रत्येक पक्षातील नेत्यांना आणि आमदारांना वाटत असतं की आपला नेता सर्वोच्च पदावर जावा. पण ते इथे (कपाळाकडे बोट दाखवत) असावं लागतं", असं म्हणत मुख्यमंत्रिपद हे नशिबात असावं लागतं असं अप्रत्यक्ष म्हणत विजय शिवतारे यांनी अजित पवारांना डिवचलं आहे. ते टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलत होते.महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. तसेच महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर आता महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन होणार आहे.

# शिवमंदिर असल्याच्या याचिकेवर नाराजी!

## ही निवृत्त सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची चूक



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काही दिवसांपूर्वीच उत्तर प्रदेशच्या संभलमध्ये शाही जामा मशिदीच्या सर्वेक्षणावरून हिंसाचार उसळला होता. या घटनेमध्ये चार जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणावरून सध्या वातावरण तापलेलं असतानाच आता राजस्थानमधून नवा वाद निर्माण होताना दिसत आहे. राजस्थानच्या अजमेरमधील प्रसिद्ध ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती दर्ग्याखाली शिवमंदिर होतं, असा दावा करणारी याचिका दाखल झाली आहे. त्या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायालयाने दर्गा प्रशासनासह केंद्रीय अल्पसंख्याक विभाग व पुरातत्व विभागाला नोटीस बजावली आहे. दरम्यान, दर्गा प्रशासनाने यासंदर्भात मोठा दावा केला आहे.**

हिंदु सेना प्रमुख विष्णू गुप्ता यांनी अजमेर येथील दिवाणी न्यायालयात यासंदर्भात एक याचिका दाखल केली आहे. या याचिकेमध्ये ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती दर्ग्याच्या जागेवर आधी एक शिवमंदिर होतं. ते पाडून तिथे दर्गा बांधण्यात आला. ही याचिका अजमेर न्यायालयानं दाखल करून घेतली असून त्याअनुषंगाने केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालय, आर्किओलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया व अजमेर दर्गा समितीला नोटीस पाठवण्यात आली आहे. या तिन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्यासाठी न्यायालयाने पुढील सुनावणी २० डिसेंबर रोजी ठेवली आहे.या याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांनी संबंधित दर्ग्यामध्ये पुरातत्व खात्यामार्फत सर्वेक्षण करण्याची मागणी केली आहे. ब्रिटिशांच्या काळात महत्त्वाच्या पदावर असणारे हर बिलास सारडा यांनी १९१० साली लिहिलेल्या एका पुस्तकामध्ये दर्ग्याच्या आधी तिथे हिंदू मंदिर असल्याचा दावा करण्यात आला असून त्या आधारावर गुप्ता यांनी ही याचिका दाखल केली आहे. या पुस्तकानुसार, दर्ग्यामध्ये मंदिरात शंकर असल्याचं एक चित्र आहे. त्याची एका ब्राह्मण परिवाराकडून अगदी अलिकडच्या काळापर्यंत पूजा केली जात होती, असा दावा गुप्ता यांनी केला आहे."सारडा यांचं नाव अजमेरमधील अनेक रस्त्यांना दिलं गेलं आहे,. त्यामुळे आम्ही न्यायालयाला विनंती केली की त्यांचा दावा आपण गांभीर्याने घ्यायला हवा. त्या ठिकाणी सर्वे केला जायला हवा. तेव्हा सत्य बाहेर येईल", असंही गुप्ता यांनी नमूद केलं.दरम्यान, यासंदर्भात दर्गा प्रशासनातील पदाधिकारी सय्यद सरवार चिश्ती यांनी प्रतिवाद करणारी भूमिका मांडली आहे.

"बाबरी मशिदीसंदर्भात न्यायालयाने दिलेला निकाल आम्ही देशहित डोळ्यांसमोर ठेवून स्वीकारला. आम्हाला असं वाटत होतं की आता पुन्हा असं काही होणार नाही. पण काशी, मथुरा, संभल... हे सत्र थांबायचं नावच घेत नाहीये. २२ जून रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले होते की लोकांनी प्रत्येक मशिदीत शिवलिंग शोधण्याचा खटाटोप बंद केला पाहिजे", असं चिश्ती म्हणाले.यावेळी बोलताना त्यांनी निवृत्त सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांचं नाव घेत त्यांच्यावर टीका केली. "ही सर्व चूक निवृत्त सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची होती", असं चिश्ती म्हणाल्याचं वृत्त इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे. २०२२ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी सर्वेक्षणाच्या मागण्यांबाबत केलेल्या टिप्पणीवर प्रामुख्याने चिश्ती यांनी ही टीका केली आहे.१९९१ च्या प्लेसेस ऑफ वरशिप ॲक्टनुसार कोणत्याही धार्मिक स्थळाची ओळख १९४७ साली भारत स्वतंत्र होताना जी होती, तीच कायम राखली जायला हवी. पण २०२२ साली न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी त्यावर टिप्पणी करताना संबंधित ठिकाणाच्या सर्वेक्षणाची मागणी करता येऊ शकते, अशा आशयाची टिप्पणी केली. पण जर संबंधित ठिकाणाची ओळख तीच कायम राहणार असेल, तर मग सर्वेक्षण करण्याचा उपयोग काय? असाही युक्तिवाद यावर केला जात आहे.

### मिटकरी यांनी पोस्ट डिलीट केली

दरम्यान, एकीकडे संभलमध्ये अशाच सर्वेक्षणावरून हिंसाचार भडकल्यानंतर आता नव्याने आणखी एका ठिकाणी अशाच प्रकारचं सर्वेक्षण करण्याची परवानगी न्यायालय देणार का? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.काही दिवसांपूर्वीच उत्तर प्रदेशच्या संभलमध्ये शाही जामा मशिदीच्या सर्वेक्षणावरून हिंसाचार उसळला होता. या घटनेमध्ये चार जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणावरून सध्या वातावरण तापलेलं असतानाच आता राजस्थानमधून नवा वाद निर्माण होताना दिसत आहे. राजस्थानच्या अजमेरमधील प्रसिद्ध ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती दर्ग्याखाली शिवमंदिर होतं, असा दावा करणारी याचिका दाखल झाली आहे. त्या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायालयाने दर्गा प्रशासनासह केंद्रीय अल्पसंख्याक विभाग व पुरातत्व विभागाला नोटीस बजावली आहे.

# जल्द ही शेर वापस आयेगा

## अजित पवारांनी अमित शाहांची भेट घेताच मिटकरीचं सूचक ट्वीट



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. या निकालानंतर आता महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन होणार आहे. सरकार स्थापनेसाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. मात्र, मुख्यमंत्री कोण होणार?**

यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठकांवर बैठका सुरु आहेत. मात्र, असं असलं तरी विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला. पण निकाल जाहीर झाल्यानंतर आज तब्बल पाच दिवस झाले आहेत. पण तरीही सरकार स्थापन झालेलं नाही. यावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून टीका करण्यात येत आहे. तसेच सरकार स्थापन करण्यासाठी नेमकी अडचणी काय आहेत? याबाबत विरोधकांकडून सवाल उपस्थित करण्यात येत आहेत. यानंतर आज देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार हे दिल्लीत दाखल झाले आहेत. महायुतीच्या या तिन्हीही नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत सरकार स्थापनेबाबत चर्चा केली. या बैठकीत महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? महायुतीचं सरकार कसं असणार? मंत्रिमंडळ कसं असणार? कोणत्या पक्षाला किती मंत्रिपद मिळणार? कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री पद कोणत्या पक्षाकडे जाणार? अशा विविध विषयावर सविस्तर चर्चा या बैठकीत झाल्याचं बोललं जातं. त्यामुळे आता मुख्यमंत्री पदाबाबत कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होतं? हे लवकरच कळणार आहे.

### अमोल मिटकरीचं ट्वीट काय?

. मात्र, असं असलं तरी अजित पवारांनी हे दिल्लीत दाखल होत अमित शाह यांची भेट घेताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी एक सूचक पोस्ट एक्सवर (ट्विटर) केली आहे. त्यांच्या या पोस्टची राजकीय वर्तुळाच चर्चा रंगली आहे.जंगल मे सन्नाटा छायेगा, जल्द ही शेर वापस आयेगा...अशा सूचक आशयाचं ट्विट अमोल मिटकरी यांनी केलं आहे. त्यांच्या या पोस्टचा नेमकी अर्थ काय? या पोस्टमधून नेमकं काय सुचवायचं आहे? याबाबत अनेकांकडून तर्कवितर्क लावले जात आहेत.

# मराठी गीतावर नारकर जोडप्याने धरला ठेका

ऐश्वर्या व अविनाश नारकर यांची जोडी कायम चर्चेत असते. या दोघांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. मराठी नाटक, चित्रपट आणि मालिका अशा तिन्ही माध्यमांमध्ये नारकर जोडप्याने आपला ठसा उमटवला आहे. हे दोघे सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात. विविध ट्रेंडिंग गाण्यांवर रील्स व्हिडीओ बनवून हे दोघेही प्रेक्षकांचं मनोरंजन करतात.सध्या सोशल मीडियावर जुन्या गाण्यांची प्रचंड क्रेझ निर्माण झाली आहे. फेसुबक, इन्स्टाग्रामवर सध्या अनेक जुनी गाणी व्हायरल होत आहेत. १९६५ मध्ये 'केला इशारा जाता जाता' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटामधील 'हिशोब सांगते ऐका भाओजी, कसा खरचला पैका!' हे गाणं आजही सर्वत्र लोकप्रिय आहे. याच मराठी गाण्यावर ऐश्वर्या व अविनाश नारकर यांनी ठेका धरला आहे.ऐश्वर्या व अविनाश यांचा या व्हिडीओमध्ये मराठमोळा अंदाज पाहायला मिळत आहे. अभिनेत्रीने ऑफ व्हाइट रंगाची साडी नेसून, पदर खोचून या गाण्यावर व्हिडीओ बनवला आहे. तर, अविनाश नारकरांनी सदरा घालून डोक्यावर टोपी असा मराठमोळा लूक करत ऐश्वर्या यांना जबरदस्त साथ दिली आहे. या व्हिडीओला अभिनेत्रीने "हिशोब..." असं कॅप्शन दिलं आहे.ऐश्वर्या व अविनाश यांचा हा मराठमोळा अंदाज पाहून नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर लाइक्स आणि कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.
४ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहे. तितीक्षा तावडे आणि अजिंक्य ननावरेने या व्हिडीओवर "कडक..." अशी कमेंट केली आहे. तर, अश्विनी कासारने या व्हिडीओवर कमेंट करत "क्या बात..." म्हटलं आहे. याशिवाय अन्य काही नेटकऱ्यांनी "ढोलकी टायमिंग कमाल", "सरांनी ढोलकीवर एकदम मस्त ताल धरलाय", "खूप सुंदर... मला तुमच्या दोघांच्या REELS खूप आवडतात, त्यात हे गाणं मला खूपच आवडतं" अशा प्रतिक्रिया दोघांच्या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, दोघांच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर ऐश्वर्या नारकर सध्या 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या 'झी मराठी'वरील मालिकेत खलनायिकेची भूमिका साकारत आहेत.

# ब्रेकअपनंतर मलायका अरोरा झाली बिझनेसवुमन!




मलायका अरोरा व अर्जुन कपूर यांचं ६ वर्षांचं नातं संपुष्टात आलं आहे. दोघांचंही ब्रेकअप झालं आहे. ब्रेकअपनंतर आता मलायकाने एक नवीन सुरुवात केली आहे. तिने मुलगा अरहानबरोबर मुंबईत स्वतःचा बिझनेस सुरू केला आहे. तिने इन्स्टाग्रामवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली. मलायकाने मुलगा अरहानबरोबर मिळून नवीन रेस्टॉरंट सुरू केले आहे. 'स्कार्लेट हाउस' असे या रेस्टॉरंटचे नाव आहे. हे सुंदर रेस्टॉरंट वांद्रे येथील ९० वर्षे जुन्या पोर्तुगीज बंगल्यात आहे. हे रेस्टॉरंट बोल्ड स्कार्लेट रंगात रंगवलेले आहे. हे रेस्टॉरंट खूपच सुंदर आहे. शटर विंडो, व्हिक्टोरियन खुर्च्या, फ्लोरल इंटिरियर व ग्रामोफोन यामुळे रेस्टॉरंटचा लूक लक्ष वेधून घेतो.बीना नोरोन्हा या स्कार्लेट हाऊसच्या मुख्य शेफ आहेत. त्या स्वतः मलायकासाठी हेल्दी पदार्थ बनवतात. रेस्टॉरंटच्या मेनूमध्ये हंगामी फळांचा समावेश असलेले सॅलड्स, बाजरीचे नूडल्स, जपानी कॉफी ग्रेड मॅचा, ग्लूटेन-फ्री रॅप्स आणि ज्वारीचा रिसोटो यासारख्या पदार्थांचा समावेश आहे. मलायका अरोराचे चाहतेही तिच्या या नव्या सुरुवातीमुळे खूप खूश आहेत. तिच्या पोस्टवर कमेंट्स करून तिला या व्यवसायासाठी चाहते शुभेच्छा देत आहेत. अर्जुन कपूरने ब्रेकअपवर शिक्कामोर्तब केल्यावर मलायका सोशल मीडियावर खूप सक्रिय झाली आहे. ती इन्स्टाग्रामवर अनेक पोस्ट शेअर करत असते. "ज्यांना मी आवडत नाहीत त्यांच्यासाठीमाझ्याकडे वेळ नाही. कारण जे माझ्यावर प्रेम करतात त्यांच्याबरोबर मी खूप व्यग्र आहे," अशा आशयाची पोस्ट तिने नुकतीच केली होती.

# म्हणून यश जोहर शाहरुखला ओरडले

बॉलीवूडचे कलाकार हे विविध कारणांमुळे सातत्याने चर्चेत असतात. त्यांच्या चित्रपटातील भूमिका, सोशल मीडियावरील पोस्ट व मुलाखतीदरम्यान केलेली वक्तव्ये यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग असतात. आता अभिनेत्री अर्चना पूरन सिंहने एका मुलाखतीत शाहरुख खानबद्दलची आठवण सांगितली आहे.अभिनेत्री अर्चना पूरन सिंहने नुकतीच 'बॉलीवूड बबल'ला नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी 'कुछ कुछ होता है' या चित्रपटाच्या सेटवरील आठवणींना उजाळा दिला. या चित्रपटातील कोई मिल गया या गाण्याच्या शूटिंगची आठवण त्यांनी सांगितली आहे. त्यांनी म्हटले,"कुछ कुछ होता है या चित्रपटातील आम्ही कोई मिल गया या गाण्याचे शूटिंग मेहबूब स्टुडिओमध्ये करीत होतो. मला आठवतं की. या गाण्याचं शूटिंग कुठेतरी दुसऱ्या मजल्यावर सुरू होतं. मी पायांत हिल्सच्या चपला घातल्या होत्या.


# ट्रोल केतकीचं उत्तर



गायिका आणि अभिनेत्री केतकी माटेगावकर ही सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. केतकी ही तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. अनेक नेटकरी केतकीच्या सोशल मीडियावरील पोस्टला कमेंट्स करतात. काही जण कमेंट्स करुन केतकीचं कौतुक करतात तर काही जण केतकीला ट्रोल करतात. केतकीनं नुकतीच एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून केतकीनं बॉडी शेमिंग करणाऱ्या आणि ट्रोलर्सला सडेतोड उत्तर दिलं आहे. केतकीनं सोशल मीडियावरील पोस्टमध्ये लिहिलं, "प्रिय लोकं, ज्यांना माझ्याप्रमाणे बॉडी शेमिंगचा सामना करावा लागतो, "किती बारीक आहेस गं", "अजून लहान मुलीचे कपडे घालतेस?","अरे खात जा जरा", "हं थंडी मानवलेली दिसतेय", "मागच्या वेळेस भेटलो तेव्हा छान बारीक होतास", आता पोट सुटलंय का जरा? नातेवाईक असो, ऑफिस मधले सहकर्मचारी असो, कोणीही असो...आपल्याला नेहमी या अशा वाक्यांना सामोरं जाव लागतं. "मी एवढं म्हणेन, यात मी तुमच्याबरोबर आहे. कारण मी हे रिलेट करु शकते. पण तुमच्या शरीराचा अभिमान बाळगा. तुम्ही सुंदर आणि युनिक आहात. देवाने दिलेल्या या वेगळेपणाला महत्त्व द्या. जर एखादा डॉक्टर, आहारतज्ज्ञ, पालक किंवा तुमचे मित्र ज्यांना तुमची मनापासून काळजी असेल, तर तुम्हाला ते जे काही सांगत असतात, त्यांचं ऐका. अशा व्यक्तीचं ऐकू नाका जी तुम्हाला खाली खेचून इच्छिते किंवा तुमचं वाईट विचार करते.", असंही केतकीनं पोस्टमध्ये लिहिलं. पुढे केतकीनं लिहिलं, "डिअर ट्रोलर्स, शरीर आपल्याला देवाने दिलेली देणगी आहे. मी तुमच्या भाषेत, स्किनी, (हाडांचा सापळा) बारीक आहे.

# उर्फीचं इंस्टाग्राम सस्पेंड ; नेटकरी म्हणाले,"स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात"

अभिनेत्री उर्फी जावेद (URFI JAVED) चर्चेत नाही असा एकही दिवस जात नाही. अभिनेत्री अनेकदा हटके आणि अतरंगी फॅशन स्टाईलमुळे किंवा बोल्ड वक्तव्यामुळे चर्चेत असते. पण आता ती एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. उर्फीचं इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झालं आहे. पोस्ट शेअर करत तिने यासंदर्भात माहिती दिली आहे. अभिनेत्री उर्फी जावेदचं इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झालं आहे. अभिनेत्रीने स्वत: स्क्रीनशॉट सोशल मीडियावर शेअर केला आहे. उर्फीचं इंस्टाग्राम सस्पेंड झाल्याचा स्क्रीनशॉट सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. इंस्टाग्राम सस्पेंड झाल्याने उर्फीचे चाहते हैराण झाले आहेत. उर्फीने सोशल मीडियावर इंस्टाग्राम अकाऊंट सस्पेंड झाल्याचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. उर्फीने आता तिचं अकाऊंट रिकवर केलं आहे. तिने शेअर केलेल्या स्क्रीनशॉटवर मेटाने दिलेली माहिती दिसत आहे. कम्यूनिटी गाइडलाइन्सचं




पालन न केल्याने इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झाल्याचं यात म्हटलं आहे. तर उर्फीने स्क्रीनशॉट शेअर करत लिहिलं आहे, उर्फीची अतरंगी फॅशन काही चाहत्यांच्या पसंतीस उतरते. तर अनेकदा यामुळे मोठ्या प्रमाणात तिला ट्रोल केलं जातं. उर्फीला अनेकदा गंभीर धमक्या मिळाल्या आहेत. जीवे मारण्याच्या धमकीपासून ते रेपपर्यंतच्या धमक्या तिला मिळाल्या आहेत. ट्रोलर्सकडे उर्फी दुर्लक्ष करत आपल्या कामावर फोकस करत असते. उर्फी जावेदच्या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एकाने लिहिलं आहे,"ही गंभीर बाब आहे". एका क्रिएटरसाठी सोशल मीडिया अकाउंट खूप महत्त्वाचं असतं. या दिवसाची मी आतुरतेने वाट पाहत होतो. खूप चांगला निर्णय, स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात". तर काहींनी मात्र 'मिस यू उर्फी' अशा कमेंट्स केल्या आहेत. उर्फी जावेद हिंदी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. उर्फी आता सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असली तरी छोटा पडदा मात्र तिने चांगलाच गाजवला आहे. दुर्गा, सात फेरों की हेराफेरी, बेपनाह, जीजी मां, डायन, ये रिश्ता क्या कहलाता है, पंच बीट सीझन 2, कसौटी जिंदगी की अशा अनेक मालिकांच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.

# श्रीनिवासन यांच्यावर फिक्सिंगचे आरोप!

## अँड्रयू फ्लिंटॉफसाठी आयपीएलच्या लिलावातही फिक्सिंग

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**इंडियन प्रीमियर लीग (IPL) चे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी अलीकडेच एका पॉडकास्टमध्ये बीसीसीआयचे माजी अध्यक्ष, माजी सचिव आणि चेन्नई सुपर किंग्जचे मालक एन श्रीनिवासन यांच्यावर पंच फिक्सिंग आणि लिलावात हेराफेरीसह अनेक गंभीर आरोप केले आहेत. २००८ ते २०१० दरम्यान आयपीएलचे संस्थापक आणि आयुक्त असलेले ललित मोदी यांनी आरोप केला की श्रीनिवासन यांना फ्रँचायझी लीग यशस्वी होईल असे वाटत नव्हते, परंतु टी-२० स्पर्धा ब्लॉकबस्टर ठरली तेव्हा त्यांनी त्यात उडी घेतली.**




आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी बीसीसीआयचे माजी सचिव एन श्रीनिवासन यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. एन श्रीनिवासन इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधील चेन्नई सुपर किंग्जच्या सामन्यांमध्ये चेन्नईच्या पंचांची नियुक्ती करत होते, असा दावा त्यांनी केला. अँड्रयू फ्लिंटॉफसाठी आयपीएलच्या लिलावातही फिक्सिंग झाल्याचे त्यांनी सांगितले.ललित मोदी यांनी अलीकडेच राज शामानी या यूट्यूब चॅनलशी केलेल्या संभाषणात सांगितले की,“त्यांना (एन श्रीनिवासन) आयपीएल आवडत नव्हते; आयपीएल यशस्वी होईल असे त्यांना वाटले नव्हते, पण जेव्हा आयपीएलला सर्वांचा जोरदार प्रतिसाद मिळाला तेव्हा सर्वजण त्यात सामील झाले. ते बोर्डाचे सदस्य आणि सचिवही होते, त्यामुळे ते माझे सर्वात मोठे विरोधक होते. जेव्हा मी त्याच्या विरोधात आवाज उठवला तेव्हा त्यांनी अनेक गोष्टी केल्या, पंच फिक्सिंग केले.” ललित मोदी म्हणाले, “यासाठी मी त्यांच्यावर आरोप केले. ते पंच बदलत असत आणि मी त्याबद्दल गोष्टींचा विचार केला नाही. पण नंतर मला कळले की ते चेन्नईच्या सामन्यांमध्ये चेन्नईच्या पंचांची नियुक्ती करत आहेत, ही माझ्यासाठी समस्या होती. याला फिक्सिंग म्हणतात, म्हणून जेव्हा मी हे प्रकरण उघड करण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते पूर्णपणे माझ्या विरोधात गेले.”ललित मोदींनी श्रीनिवासन यांच्यावर इंग्लंडच्या अँड्रयू फ्लिंटॉफसाठी बोली लावण्यासाठी फिक्सिंगचा आरोपही केला. ते म्हणाला की, “त्यांनी इतर प्रत्येक संघांना खेळाडू (अँड्रयू फ्लिंटॉफ) साठी बोली लावू नये असे सांगितले होते. ललित मोदींनी सांगितले की, त्यांना चेन्नई सुपर किंग्जमध्ये फ्लिंटॉफ हवा होता, पण लिलावातच त्याला संघात विकत घेतल्याचे श्रीनिवासन यांना दाखवायचे होते.”ललित मोदी म्हणाले, “मी फ्लिंटॉफला श्रीनिवासन यांना लिलावात घेऊ दिले. होय, आम्ही ते केले. यात शंका नाही, प्रत्येक संघाला याची कल्पना होती.’ ललित मोदी म्हणाले, ‘श्रीनिवासन आयपीएल सुरू होऊ देणार नव्हते, ते याच्यातला मोठा अडथळा होते. या कारणामुळेच अँड्रयू फ्लिंटॉफसाठी बोली लावू नका असे मी सर्वांना सांगितले.” ललित मोदी म्हणाले, ‘हो, मी ते केलं कारण श्रीनिवासन म्हणाले की मला अँड्रयू फ्लिंटॉफ हवा आहे. पण जेव्हा तुम्ही आयपीएलसारखी मोठा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न करत असाल... आणि मी ते एकट्याने केलं आहे,... तेव्हा तुम्हाला प्रत्येक अडथळा दूर करावा लागतो, खेळासाठी काय मोठं आहे. प्रत्येक खेळाडू फक्त तीन महिन्यांसाठी असतो. आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी बीसीसीआयचे माजी सचिव एन श्रीनिवासन यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. एन श्रीनिवासन इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधील चेन्नई सुपर किंग्जच्या सामन्यांमध्ये चेन्नईच्या पंचांची नियुक्ती करत होते, असा दावा त्यांनी केला. अँड्रयू फ्लिंटॉफसाठी आयपीएलच्या लिलावातही फिक्सिंग झाल्याचे त्यांनी सांगितले.ललित मोदी यांनी अलीकडेच राज शामानी या यूट्यूब चॅनलशी केलेल्या संभाषणात सांगितले की,“त्यांना (एन श्रीनिवासन) आयपीएल आवडत नव्हते; आयपीएल यशस्वी होईल असे त्यांना वाटले नव्हते, पण जेव्हा आयपीएलला सर्वांचा जोरदार प्रतिसाद मिळाला तेव्हा सर्वजण त्यात सामील झाले. ते बोर्डाचे सदस्य आणि सचिवही होते, त्यामुळे ते माझे सर्वात मोठे विरोधक होते. जेव्हा मी त्याच्या विरोधात आवाज उठवला तेव्हा त्यांनी अनेक गोष्टी केल्या, पंच फिक्सिंग केले.

### प्रकरण उघड करण्याचा प्रयत्न

” ललित मोदी म्हणाले, “यासाठी मी त्यांच्यावर आरोप केले. ते पंच बदलत असत आणि मी त्याबद्दल गोष्टींचा विचार केला नाही. पण नंतर मला कळले की ते चेन्नईच्या सामन्यांमध्ये चेन्नईच्या पंचांची नियुक्ती करत आहेत, ही माझ्यासाठी समस्या होती. याला फिक्सिंग म्हणतात, म्हणून जेव्हा मी हे प्रकरण उघड करण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते पूर्णपणे माझ्या विरोधात गेले.”ललित मोदींनी श्रीनिवासन यांच्यावर इंग्लंडच्या अँड्रयू फ्लिंटॉफसाठी बोली लावण्यासाठी फिक्सिंगचा आरोपही केला. ते म्हणाला की, “त्यांनी इतर प्रत्येक संघांना खेळाडू (अँड्रयू फ्लिंटॉफ) साठी बोली लावू नये असे सांगितले होते. ललित मोदींनी सांगितले की, त्यांना चेन्नई सुपर किंग्जमध्ये फ्लिंटॉफ हवा होता, पण लिलावातच त्याला संघात विकत घेतल्याचे श्रीनिवासन यांना दाखवायचे होते.

# पिंक बॉलपूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघात बदल

## दुसरा कसोटी सामना 6 डिसेंबरपासून खेळवला जाणार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ चा पहिला सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ येथे खेळला गेला. या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी पराभव करत मोठा विक्रम रचला. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर सर्वात मोठा विजय नोंदवण्याचा विक्रम केला. त्याचबरोबर या पराभवानंतर ऑस्ट्रेलियन कॅम्पमध्ये चांगलीच खळबळ आहे.**





जिथे संघ कसोटीत आजवर कधीच पराभूत झाला नव्हता. पण भारताने हा पराक्रम केल्यानंतर आता ऑस्ट्रेलियाने संघात बदल करत अष्टपैलू खेळाडूला संघात सामील केलं आहे.ऑस्ट्रेलिया संघाचा अष्टपैलू खेळाडू मिचेल मार्श दुखापतीमुळे त्याच्या जागी नव्या खेळाडूला संघात सामील केलं आहे.

त्याच्या जागी कांगारू संघाने अनकॅप्ड अष्टपैलू खेळाडूची संघात निवड केली आहे. मार्शच्या जागी ऑस्ट्रेलियन संघाने शेफिल्ड शिल्डमध्ये तस्मानियाकडून खेळणाऱ्या ब्यू वेबस्टरचा भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी ऑस्ट्रेलियन संघात समावेश केला आहे. मिचेल मार्शसाठी कव्हर म्हणून ब्यू वेबस्टरचा संघात समावेश करण्यात आला आहे.ब्यू वेबस्टर याचा प्रथमच आंतरराष्ट्रीय संघात समावेश करण्यात आला आहे. १ डिसेंबर १९९३ रोजी होबार्ट, तस्मानिया येथे जन्मलेल्या ब्यू वेबस्टरचा देशांतर्गत क्रिकेटमध्ये उत्कृष्ट विक्रम आहे.प्रथम श्रेणी, ५४ लिस्ट ए आणि ८९ टी-२० सामने खेळले आहेत. ब्यू वेबस्टरने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ३७.८३ च्या सरासरीने ५२९७ धावा आणि १४८ विकेट घेतल्या आहेत.

### कोण आहे ब्यू वेबस्टर?

लिस्ट ए मध्ये त्याने ३१.३५ च्या सरासरीने १३१७ धावा आणि ४४ विकेट घेतल्या आहेत. यामध्ये एक शतक आणि ७ अर्धशतकांचा समावेश आहे. टी-२० क्रिकेटमध्ये त्याने २७.१६ च्या सरासरीने १६३० धावा केल्या आहेत, तर २१ विकेट्स घेतल्या आहेत.भारत ‘अ’ विरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेतील कसोटी सामन्यात त्याच्या अलीकडील चांगल्या कामगिरीमुळे वेबस्टरचा संघात समावेश करण्यात आला.